अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २२ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## ५००व्या सामन्यात कोहलीची विराट कामगिरी, कसोटीतील २९ वे शतक ठोकले

**मुंबई :** विराट कोहलीने ५०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात शतक झळकावले आहे. वेस्ट इंडिजविरोधात सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात विराट कोहलीने शतक ठोकले. विराट कोहलीचे हे कसोटीमधील २९ वे शतक आहे. वनडे, टी २० आणि कसोटी असे एकूण ७६ वे कसोटी शतक झळकावले आहे. दुसऱ्या कसोटी सामन्यात विराट कोहलीने संयमी फलंदाजी करत शतक झळकावले. १८० चेंडूमध्ये दहा चौकारांच्या मदतीने विराट कोहलीने शतक ठोकले. अजिंक्य रहाणे झटपट तंबूत परतल्यानंतर विराट कोहलीने जाडेजाच्या साथीने भारताच्या डावाला आकार दिला.

विराट कोहली आणि रविंद्र जाडेजा यांच्यापुढे वेस्ट इंडिजची गोलंदाजी दुबळी जाणवत होती.



विराट आणि जाडेजा यांनी पाचव्या विकेटसाठी शतकी भागिदारी करत भारतीय संघाच्या डावाला आकार दिला. विराट कोहलीने शतक झळकावत खास विक्रम केला आहे. विदेशात सर्वाधिक शतक ठोकणाऱ्या भारतीय फलंदाजामध्ये विराट कोहली दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. सचिन तेंडुलकरपेक्षा फक्त एक शतक मागे राहिला आहे. विराट कोहलीने विदेशात २८ शतके ठोकले आहेत. सचिन तेंडुकरने विदेशात २९ शतके ठोकले आहेत.

# दे दणादण...सर्वत्र संततधार

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**सोलापूरसह जिल्ह्याच्या अनेक भागात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पाऊस पडत आहे. या दोन दिवसात सूर्यदर्शनही झाले नाही. साऱ्या जिल्ह्यावर काळसर ढगाचा अंधार पसरला असून येत्या काळात अजून जोरदार पर्जन्यवृष्टी होण्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवला गेला आहे. सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पर्जन्यवृष्टी होत असल्याने दौंडजवळून धरणात येवून मिसळणाऱ्या पाण्याचा फ्लो वाढला आहे. शुक्रवारी सायंकाळी सहापर्यंत २४ हजार ५२४ क्युसेकचा विसर्ग धरणात येत आहे. चातक पक्षाप्रमाणे उजनीकडे डोळे लावून बसलेल्या सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ही एक गूड न्यूज. अजून असाच फ्लो येत राहिला तर उजनीची वाटचाल प्लसकडे निश्चित होईल.**

## ▪ ‘उजनी’ची वाटचाल प्लसकडे
## ▪ गर्द हिरवाईने ‘काळी आई’ नटणार



संततधार पावसामुळे शेतातील सरींमध्ये पाणी थांबले आहे. भंडारकवठे भागातील हे दृश्य..

**जनजीवनावर परिणाम :** शहरात गेली दोन दिवस झाले संततधार चालू आहे. गुरूवारी रात्रीपासून पावसाची रिपरिप सुरु होती. शुक्रवारी सकाळपासून पुन्हा पावसाची सुरूवात झाली ती दिवसभर होती. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. वाहतूक कोंडी, पाणी साचणे आणि वीज खंडित होण्याचे प्रकार घडले. सखल भागात पाणी साचले आहे. या पावसामुळे नोकरदार वर्ग, शाळकरी मुले यांची कुचंबना झाली. छत्र्या रेनकोट खरेदीसाठी मोठी गर्दी दिसून आली. शहरात रात्री साडेआठपर्यंत १५ मिमी पावसाची नोंद झाली.

यंदाच्या पावसाळ्यातील रोहिणी, मृग, आर्द्रा ही तीनही नक्षत्रे कोरडी गेली.मृग नक्षत्राच्या काळात केवळ दोन दिवस चांगला पाऊस बरसला. पुढच्या पावसावर भरवसा ठेवत शेतकऱ्यांनी मृगाच्या अल्प पावसावर खरीपाच्या पेरण्या उरकून घेतल्या पण पुढे पावसाने दडी मारल्यानंतर बळीराजाला कपाळावर हात बडवून घेण्याची वेळ आली होती.भीमा-सीना या नद्या कोरड्या पडल्या.वाड्या वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली.चाऱ्या अभावी पशुधन कसे जगवायचे या हा एक यक्षप्रश्न निर्माण झाला होता.अवर्षण स्थितीची टांगती तलवार या जिल्ह्यावर होती.

परंतु ‘भगवान की घर में देर है,लेकिन अंधेर नाही’,या उक्तीप्रमाणे पुष्य नक्षत्र सोलापूरच्या मदतीला धावून आले.त्याअगोदर पुनर्वसू नक्षत्राने जाता जाता बरसात करून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित केल्या होत्या.पुष्य नक्षत्राच्या कृपेने दुधात साखर पडली आहे. या पावसामुळे खरीप पिकांना जीवदान मिळाले असून पुढे होणाऱ्या रब्बी हंगामासाठी जमिनीत ओल निर्माण होण्यास या पावसाची मोलाची मदत होणार आहे. या पावसामुळे जमीन ओल धरते आणि पुढच्या काळात आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त ही मुसळधार पावसाची नक्षत्रे आहेत. त्यांचा पाऊस पडला तर या ओलीमुळे जलसाठे भरण्यात मदत होणार आहे. म्हणून पुष्य नक्षत्राचा पाऊस महत्वाचा मानला जातो. गेल्या दोन दिवसात अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, माढा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, बार्शी, मंगळवेढा व करमाळा या तालुक्यांमध्ये संततधार पाऊस झाल्याची माहिती आमच्या प्रतिनिधींनीं दिली. अक्कलकोट तालुक्यात चार दिवसांपासून पाऊस पडत असल्याचे सांगण्यात आले.

### काळ्या आईसाठी पुष्य नक्षत्र वरदान...

पावसाळ्यातील प्रत्येक नक्षत्रांना स्वभाव आहे. तो निसर्गाने दिला आहे. पुष्य नक्षत्रात संततधार असते. त्याला ग्रामीण बोलीभाषेत भीज पाऊस म्हटले जाते. हा पाऊस खरीप आणि रब्बी हंगामाला अत्यंत पोषक असतो. आपल्या जिल्ह्यात खरीपात तूर,उडीद,सोयाबिन,मका,बाजरी ही पिके घेतली जातात.पुढे श्रीगणेशाचे आगमन झाल्यानंतर रब्बी पेरण्यांची लगबग सुरू होते. या पावसाने ‘काळी आई’ हिरवाईने नटून जाते. या हिरवाईतून पशुधनाला चारा मिळतो. ठिकठिकाणी साठणाऱ्या पाण्यातून त्यांची तहानही भागते. त्यामुळे पशू सांभाळणारा मालक निश्चिंत असतो. म्हणून पुष्य नक्षत्र काळ्या आईसाठी वरदान म्हटले जाते.

### उजनीवर लक्ष कशासाठी ?

पावसाळा आला की, उजनी धरण केव्हा भरणार याकडे सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहाते.सोलापूर शहरातील १५ लोकवस्तीचे शहर,सिंचन क्षेत्र,नगरपालिका या भागांचा पाणी पुरवठा उजनीवर अवलंबून असतो.उजनी १०० टक्के पॅक झाली की,सोलापूरची वर्षभराची काळजी मिटून जाते. उजनी भरल्याखेरीज शेतकरी ऊस लावण्याचा नाद करत नाहीत.त्यामुळे यंदा ऊस लागवड ठप्प झाली होती.उजनी ५० टक्के झाली की-ऊस लागवडीला वेग येईल,असे जाणकारांनी सांगितले.आठ दिवसांपूर्वी उजनीतील पाण्याची पातळी -३७ टक्के होती.बुधवारपासून पाणी येण्यास सुरूवात झाली असून शुक्रवारी सायंकाळी ही पातळी - ३० टक्के झाली आहे.म्हणजे गेल्या दोन दिवसात ७ टक्क्यांनी पाणी वाढले.



### पावसावरचे अर्थकारण...

पावसामुळे ग्रामीण भागातील अर्थकारण फिरायला लागते.पावसाअभावी खरीपाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत.त्यामुळे बियाणे व खतांच्या खरेदी-विक्रीत मंदी आली होती मात्र आता पाऊस पडल्यामुळे उघडीप मिळाल्यानंतर खरीप पेरण्यांना वेग येईल आणि खत-बियाणांच्या खरेदीत वाढ होईल.या पावसामुळे कृषी केंद्र चालकांमध्येही आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## आठवीतील दोन मुलींना लग्नासाठी दमदाटी

**▸ दोघा मुलांसह आईवर गुन्हा दाखल**

**सोलापूर :** शहरातील पूर्व भागामध्ये शिकत असलेल्या दोन अल्पवयीन मुलींना रिक्षातून दोघा तरुणांनी जुना विडी घरकुल येथे नेऊन एकीला जबरदस्तीने घरात कोंडले तर दुसऱ्या मुलीस लग्न कर म्हणून दमदाटी केल्याप्रकरणी दोन मुले व एकाची आई या तिघांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आठवी शिकणाऱ्या या दोन्ही मुली रोज जुना विडी घरकुल मधून सिटी बस मधून पूर्व भागातील एका शाळेत येतात.१८ जुलै २३ रोजी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास दोघी कन्ना चौकात उतरून शाळेत जात असताना गाडीवरून दोन मुले आली.त्यापैकी एका मुलाने दोन्ही मुलींना रिक्षात बसवून जुना विडी घरकुलात नेले. तेथे एका मुलाने त्यापैकी एका मुलीस मोटारसायकलवर बसवून आपल्या घराकडे घेऊन गेला व आईसमोर या मुलीवर माझे प्रेम आहे.हिच्याबरोबर मी लग्न करणार आहे, असे सांगितले. तसेच आईने सुद्धा तुझ्या प्रेमात माझा मुलगा वेडा झाला आहे. असे म्हणून त्या मुलीस दमदाटी केली.तर दुसऱ्या मुलाने दुसऱ्या मुलीस घरकुलच्या दुसऱ्या भागात नेऊन एका घरात कोंडले व तिचा विनयभंग केला. दोन तासांनी दोघींना घराजवळ आणून सोडले.त्यामुळे त्या मुलींच्या आईने फिर्याद दिली असून,एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कैद्यांना मोबाईल पुरविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघांविरुध्द गुन्हा

**सुराज्य/लक्ष्मीदहिवडी**

मंगळवेढा सबजेल मध्ये असलेल्या कैद्यांना भेटून मोबाईलवरुन त्यांच्या वडिलासोबत बोलणे करुन देण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आदित्य अरुण सोनवले (वय २२ रा.बेगमपूर) व समर्थ राजाराम मोरे या दोघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

जुन्या सबजेलचे दुरुस्ती कामकाज सुरु असल्याने तेथील सर्व कैदी नवीन तहसिल कार्यालय सबजेल मध्ये ठेवण्यात आले आहेत. यातील फिर्यादी तथा सबजेलर सिताराम रायाप्पा कोळी हे दि.२० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता हे कर्तव्यावर असताना गार्ड अंमलदार पोलीस हवालदार जाधव यांनी कारागृहाच्या पाठीमागील खिडकीतून कैद्यांना वरील आरोपी काहीतरी वस्तू पुरवत असल्याबाबत लेखी रिपोर्ट देवून त्यांनी फिर्यादीस सांगितले. त्यांना जागीच रंगेहाथ पकडले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## कुमार आशीर्वाद सोलापूरचे नवे जिल्हाधिकारी, मनिषा आव्हाळे झेडपीच्या सीईओ

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची बदली झाली आहे. शंभरकर यांच्या जागी गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुमार आशीर्वाद यांची नियुक्ती केली आहे. तर सोलापूर जिल्हा परिषदेच्या सिईओ पदी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी क्रमांक दोन मनीषा आव्हाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूरला दोन थेट आयएएस अधिकारी मिळाले आहेत.

आशीर्वाद आयआयटी पदवीधर आहेत. २०१६ मध्ये आयएएस झाले आहेत. त्यासाठी त्यांनी पाच वेळा प्रयत्न केल्यानंतर हे यश मिळाले आहे. त्यांचे शालेय आणि महाविद्यालय शिक्षण दार्जीलिंग आणि जमशेदपुर येथे झाले आहे.

मिलिंद शंभरकर यांनी जिल्हाधिकारी पदावर तब्बल साडेतीन वर्षे काम केले आहे. तर मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना ही अडीच वर्षे झाली आहेत.

मिलिंद शंभरकर आणि दिलीप स्वामी यांनी कोरोना काळात मोठे काम केले आहे.सोलापूर शहरजिल्ह्यामध्ये ऑक्सीजन प्रकल्प उभारण्याचे मोठे काम यांनी केले. त्याशिवाय कोरोना काळात रुग्णांची होणाऱ्या आर्थिक लुटीला लगाम घालत हॉस्पिटलवर वचक बसवला होता.मिलिंद शंभरकर यांची महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या





मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी कोरोनाच्या दोन्ही लाटेत चांगल्या पद्धतीने सोलापूरला काम केले. या दोन्ही लाटे मधून त्यांनी सोलापूरला बाहेर काढले होते. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती देण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना अद्याप कोणतीही जबाबदारी दिली नाही. स्वामी ज्यावेळी मसुरीला प्रशिक्षणासाठी गेले होते. त्यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी क्रमांक दोन मनीषा आव्हाळे यांच्याकडे सिईओ पदाचा पदभार दिला होता. त्यावेळी आव्हाळे यांनी एका महिन्यात सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांवर चांगला वचक बसवला होता. त्यावेळी आव्हाळे यांच्याकडेच कायम सिईओ पदाचा पदभार राहणार असल्याची चर्चा होती. आता स्वामी यांची बदली झाल्याने आव्हाळे यांना झेडपीचे सिईओ पद मिळाले आहे.

## मोहोळ तहसील आवारात अभियंत्याची खुर्चीच ठेवली डबक्यात

**मोहोळ :** गेले तीन दिवस पावसाची संततधार सुरु असल्याने मोहोळ तहसील आवाराला डबक्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. वारंवार सांगूनही बांधकाम विभाग ढिम्म झाल्याने अभियंत्यांची खुर्चीच डबक्यात आणून ठेवली.

सकाळी ११ वाजता दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते



नागेश बिराजदार यांनी तहसील कार्यालयाच्या आवारातील पाणी साठलेल्या खड्ड्यांमध्ये ते ही पावसात बसून व त्या ठिकाणी वृक्षाचे रोप लावून हलगी वाजवत आंदोलनाला सुरुवात केली. नागरिकांच्या तक्रारी गेल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष रमेश बारसकर व त्यांच्या कार्यकर्त्यांनी चक्क आंदोलनामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याची प्रतीकात्मक खुर्चीच त्या पाणी साठलेल्या डबक्यात आणून ठेवून घोषणाबाजी केली. या आंदोलनात मोहोळचे माजी नगरसेवक अतूल क्षीरसागर, मोहोळ विधानसभा कार्याध्यक्ष मंगेश पांढरे, मोहोळ शहर कार्याध्यक्ष आबासाहेब कांबळे, मोहोळ तालुका उपाध्यक्ष सूरज जाधव, युवा नेते संतोष सोलनकर, प्रकाश सोनवणे, जितेंद्र अष्टूळ, सागर अष्टूळ, रमेश सनगर, अनित बळवंतकर आदी सहभागी झाले होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दरडी कोसळल्यावर त्यांना आमचं अस्तित्व समजते!!

कल्याण
689-31-137

मेन बाजार
259-69-469

## विमानसेवेवरुन आ.शिंदे-आ.देशमुख यांच्यात शाब्दिक चकमक

**सुराज्य/मुंबई**

होटगी रोड विमानसेवेला अडथळा ठरणारी श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी अखेर पाडली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. आता चिमणी पाडून महिना होत आला परंतु अद्यापही विमानसेवा सुरू का झाली नाही, असा सवाल आमदार प्रणिती शिंदे यांनी आज विधानसभेत केला. याबरोबरच बोरामणी विमानतळासाठीची उर्वरित भूसंपादनाची प्रक्रिया त्वरित सुरू करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी आ. शिंदे यांनी यात राजकारण आणले जात असल्याचा आरोप करताच आ. सुभाष देशमुख यांनी वस्तुस्थिती सांगून त्यांना



प्रतिउत्तर दिले. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत आमदार प्रणिती शिंदे यांनी बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीस तात्काळ सुरू करण्यात यावे पाईंट ऑफ इन्फॉरमेशन या आयुदा द्वारे प्रश्न उपस्थित केला. सोलापूर येथे होटगी रोड येथे विमानतळ आहे तेथे एका रात्रीच साखर कारखान्याची चिमणी पाडण्यात आली, कोणत्या पद्धतीत पाडण्यात आली कारखान्याच्या एक किलोमीटर परिसरात कुणालाही प्रवेश देण्यात आला नाही. ते तावडीत सापडतील त्यांना उचल की आत घाल ही एकमेव भूमिका पोलिसांनी घेतली होती. पोलिसांनी इतका तगडा बंदोबस्त ठेवला होता की, चिमणीच्या बाजूने भूमिका घेणारे गप्पगुमान



झाल्याचे दिसून आले होते. कारखाना परिसरात सारा लवाजमा तैनात केल्यानंतर बुधवारी पहाटे ५ वाजल्यापासून प्रशासनातर्फे चिमणी पाडकाम प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली होती. कारखान्याच्या परिसरात दीड ते दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सहाहून अधिक ॲम्बुलन्स कारखाना स्थळावर तैनात करण्यात आले होते. चिमणी पाडल्यानंतर दुसऱ्या दिवशीच विमानतळ सुरू होणार होते. होटगी रोड येथे विमानतळ आहे परंतु तेथे चिमणीचा अडथळा आहे असे म्हणून चिमणी पाडण्यात आली, यामध्ये कोणते राजकारण आहे ते समजत नाही. चिमणी अचानक पाडली परंतु अद्याप विमानसेवा सुरू झालेली नाही, ते विमानतळ पण ठप्प आहे, बोरामणी विमानतळ पण ठप्प आहे. याकरिता कोणताही निधी मिळत नाही तेथे माळढोकच्या नावाखाली भूसंपादन होत नाही. सोलापूर येथे एकेकाळी किंग फिशर सारखे विमान उतरत होते.

परंतु सत्ता पालट झाल्यानंतर विमानसेवा बदलण्यात आली आहे. सोलापूर बरोबर कोणते राजकारण करण्यात येत आहे. बोरामणी येथील विमानतळाकरिता ३३ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येऊन ते सुरू करण्यात यावे यामध्ये अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करण्यात यावी. सोलापूर येथील होटगी रोड विमानतळ सुरू करण्याकरिता चिमणी पाडण्यात आली तेथे विमानसेवा सुरू का झाली नाही?, असा सवाल आ. शिंदे यांनी केला. यासंदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करून हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मंत्री गुलाबराव पाटील यांनी



### राजकारण नव्हे न्यायालयाचा आदेश : सुभाष देशमुख

होटगी रोडवरील विमानसेवेसाठी सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी अडथळा ठरत होती. याबाबत गेल्या-तीन वर्षापासून न्यायालयात दावे-प्रतिदावे झाले. त्यानंतर न्यायालयाने चिमणी पाडण्याचे आदेश दिले. तसेच आदेश पर्यावरण विभागाने दिले. त्यानुसारच चिमणी पाडकाम करण्यात आले. यामध्ये कुठल्याची प्रकारचे राजकारण नाही. जनतेच्या हिताच्या गोष्टी होत असताना विनाकारण राजकारण मधे आणून त्याचा फायदा घेण्याचा कुणी प्रयत्न करु नये, असे प्रतिउत्तर भाजपाचे आ. सुभाष देशमुख यांनी आ. प्रणिती शिंदे यांना दिले.